भाषा संचालनालय
क्रमांक ...
आवक क्रमांक 9022 22-2-85

3६९५

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक हिभाप-१०८३/१४४८/वीस,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ डिसेंबर १९८४.

वाचा : १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिभाप-१९७६/२८, दिनांक १० जून १९७६.

२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिभाप-१०८०/१३१/वीस, दिनांक २५ मे १९८१.

३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिभाप-१०८३/१४४८/वीस, दिनांक १७ डिसेंबर १९८३.

शासन निर्णय : माध्यमिक शालांत परीक्षा हिंदी हा संयुक्त विषय [उदाहरणार्थ हिंदी - त, हिंदी-मराठी, हिंदी-उर्दू इ. ] घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना र्थ मंडळाच्या उच्चश्रेणी व निम्नश्रेणी हिंदी परीक्षेतून सूट देय नाही, मात्र १०० गुणांचा ी विषय घेऊन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या अधिकाऱ्यांना एतदर्थ ाच्या निम्नश्रेणी व उच्चश्रेणी हिंदी भाषा परीक्षेतील सूट देता येईल असा खुलासा शासन यं, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिभाप-१०८२/१४४८/२०, दिनांक १७ डिसेंबर ३ अन्वये करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रातील तसेच अन्य राज्यांतील काही माध्य- शालांत परीक्षा मंडळांतर्फे घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षांना हिंदी हा गुणांचा स्वतंत्र हिंदी विषय असून ५० गुणांचा हिंदी विषय घेऊन माध्यमिक शालांत क्षा उत्तीर्ण झालेले अनेक अधिकारी शासन सेवेत आहेत. तसेच माध्यमिक शालांत परीक्षे- ी हिंदी-संस्कृत, हिंदी-मराठी, हिंदी-पाली, हिंदी-उर्दू संयुक्त विषय असला तरी ा हिंदी भाषा इयत्ता ५ वी पासून शिकविली जाते व नव्याने शासन सेवेत आलेले क कर्मचारी संयुक्त हिंदी विषय घेऊन शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. ५० गुणांचा त्र हिंदी विषय घेऊन तसेच संयुक्त हिंदी विषय घेऊन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण ल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना सूट देता येईल का या प्रश्नाचा उपरोक्त दिनांक डिसेंबर १९८३ च्या आदेशासंदर्भात फेरविचार करण्यात आला व हिंदी हा संयुक्त य [उदा. हिंदी-संस्कृत, हिंदी-मराठी, हिंदी-उर्दू] घेऊन, तसेच ५० अथवा १०० या स्वतंत्र हिंदी विषय घेऊन माध्यमिक शालांत परीक्षा किंवा माध्यमिक शालांत क्षेपेक्षा उच्च परीक्षा उत्तीर्ण झालेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना एतदर्थ मंडळाच्या ी भाषा परीक्षेतून सूट देण्यात यावी असा निर्णय शासनाने घेतला आहे. हे आदेश ांक १७ डिसेंबर १९८३ च्या पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

र. रा. कुलकर्णी,
शासनाचे उप सचिव.